शासकीय सेवेत मागासवर्गीयांसाठी [illegible]
आरक्षणाबाबतचे आदेशांची अंमलबजावणी.

विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली
मागासवर्ग कक्ष निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-१०८५/२९८८/१६-ब,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ ऑगस्ट, १९८६.

मागासवर्गीयांच्या शासकीय सेवेतील आरक्षणाबाबतचे धोरण व शासकीय आदेशांची अंमलबजावणी योग्यरितीने होते किंवा नाही हे पाहण्यासाठी सामान्य प्रशासन विभागामध्ये एक खास कक्ष निर्माण करण्यात आला आहे. सदर कक्षामध्ये प्रामुख्याने मागासवर्गीयांसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणांबाबतच्या धोरणात्मक बाबी हाताळणे व त्यांची अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहण्यासाठी राज्यातील सर्व स्तरावरील शासकीय/निमशासकीय कार्यालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन शासकीय आदेशांची अंमजबजावणी केली जाते किंवा नाही हे पहाणे, तसेच राज्यातील सर्व स्तरावरील शासकीय/निमशासकीय कार्यालयातील कर्मचा-यांची सेवा विषयक गा-हाणी तपासून त्यावर योग्य कार्यवाही करणे इत्यादि स्वरुपाची कामे या कक्षाकडे सोपविण्यात आली आहेत. सामान्य प्रशासन विभागातील मागासवर्ग कक्षाकडे सोपविण्यात आलेली विविध कामे लक्षांत घेता सदर कक्ष मंत्रालयीन विभागात केंद्रीत असल्याने विभागीय व जिल्हा पातळीवरील कार्यालयांत शासकीय आदेशांची योग्यरितीने अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहण्यासाठी तसेच त्या स्तरांवरील कार्यालयांतील शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांच्या सेवाविषयक गा-हाणांच्या संदर्भात अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने अपुरा आहे असे अभिप्राय व्यक्त करुन विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने त्यांच्या १९८२-८३ च्या अहवालांत आग्रहाची शिफारस केली होती की, मागासवर्गीयांसाठी असलेल्या आरक्षणाबाबतच्या शासकीय आदेशांची सर्व स्तरावर परिणामकारकरित्या अंमलबजावणी व्हावयाची असेल तर प्रशासकीय दृष्टया समन्वय साधण्यासाठी मंत्रालयीन पातळीवर प्रत्येक विभागांत एक वेगळा कक्ष निर्माण करण्यात यावा. अशा स्वरुपाची शिफारस आयुक्त, अनुसूचीत जाती/जमाती, केंद्र शासन यांनीही केली होती.

२. वरील शिफारशींच्या अनुषंगाने प्रत्येक मंत्रालयीन विभागात वेगळा कक्ष निर्माण केल्यास त्यावर अधिक खर्चाचा होणारा बोजा व प्रशासकीय अडचणी लक्षात घेता प्रत्येक मंत्रालयीन विभागांत वेगळा कक्ष निर्माण करण्यापेक्षा विभागीय पातळीवर विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली आवश्यक अधिकारी व कर्मचा-यांची पदे

[ क. पा. प. ]

निर्माण करून विभागीय पातळीवर वेगळा कक्ष निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदर प्रस्तावाचे सखोल परिक्षण करून शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

३. १. शासनाने विकेंद्रीकरण करण्याबाबतचे धोरण व मागासवर्गीय कर्मचा-यांच्या सेवाविषयक गा-हाण्यांवर शीघ्रतेने अंतिम निर्णय घेण्याची आवश्यकता लक्षात घेऊन प्रत्येक विभागीय आयुक्ताच्या अधिपत्याखाली एक वेगळा "मागासवर्ग कक्ष" निर्माण करण्यात यावा. वरील प्रमाणे निर्णय घेताना शासनाने असेही ठरविले आहे की, सदर कक्ष आयुक्त कार्यालयात सध्या असलेल्या अधिकारी व कर्मचारी वृंदामधून निर्माण करण्यात यावा. पर्यायाने वेगवेगळया योजनेसाठी निर्माण केलेली अधिका-यांची व कर्मचा-यांची पदे सदर योजना समाप्त करण्यात आल्या असल्या तरी तशीच पुढे चालू ठेवण्यात आलेल्या व अतिरिक्त ठरविलेल्या पदांमधून आवश्यक ती पदे मागासवर्गीय कक्षासाठी उपलब्ध करून घेण्यात यावीत.

३. २ सर्व साधारणपणे सदर कक्षामध्ये एक अर्धवेळ सहायक आयुक्तांच्या दर्जाच्या अधिका-याबरोबर पूर्ण वेळ १ नायब तहसीलदार, २ अवल कारकून व एक लिपिक-टंकलेखक यांचा समावेश असावा. आवश्यक वाटल्यास वर्ग-१ अधिका-याच्या सेवा, सध्या असलेल्या अधिका-यांमध्ये कामाचे पुर्नवाटप करून उपलब्ध करून घ्याव्यात. सदर अधिकारी कमीत कमी $\frac{१}{२}$ [अर्धा] दिवस कक्षाच्या कामाची जबाबदारी घेऊ शकेल अशी व्यवस्था करावी.

३. ३. वरील शासन निर्णयानुसार सर्व विभागीय आयुक्तांना असे आदेश देण्यात येत आहेत की, प्रत्येक विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली एक मागासवर्गीय कक्ष १. ९. १९८६ पर्यन्त निर्माण करण्यात यावा.

४. १. वरील प्रमाणे प्रत्येक विभागीय पातळीवर मागासवर्गीय कक्ष निर्माण केल्यानंतर म्हणजे १. ९. ८६ पासून सामान्य प्रशासन विभागातील मागासवर्ग कक्ष व विभागीय पातळीवर विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली निर्माण करण्यात येणारा मागासवर्ग कक्ष यांची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

सामान्य प्रशासन विभागातील मागासवर्ग कक्ष :-

अ] राजपत्रित वर्ग १ व वर्ग २ ची सर्व प्रकरणे
ब] वर्ग ३ ची राज्यस्तरीय संवर्गातील कर्मचा-यांची प्रकरणे [स्टेट लेव्हल कॅडर]
क] मंत्रालयीन विभागातील वर्ग ३ व वर्ग ४ ची सेवाविषयक प्रकरणे, आणि
ड] प्रत्यक्ष पहाणी/तपासणीचे काम हे मर्यादित स्वरुपाचे असेल, म्हणजे ज्या विभाग प्रमुखांच्या कार्यालयातील वर्ग ३ ची पदे राज्यस्तरावर असतील [स्टेट लेव्हल कॅडर] त्या कार्यालयाची तपासणी व इतर कार्यालयापैकी [illegible],

काही
∠ कार्यालयांची नमुना तपासणी करणे, तसेच राज्यातील महामंडळे, महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा इत्यादि कार्यालयांची वर्ग १ व वर्ग २ च्या किंवा तत्सम कर्मचा-यांच्या अनुषंगाने तपासणी करणे.

विभागीय आयुक्ताच्या कार्यालयांत निर्माण करण्यात येणारा मागासवर्ग कक्ष :-

अ] वर्ग ३ च्या राज्यस्तरावरील सर्व संवर्गातील कर्मचा-यांच्या गा-हाण्या व्यतिरिक्त विभागीय/जिल्हा पातळीवरील सर्व कार्यालयामधील वर्ग ३ व ४ मधील मागासवर्गीय कर्मचा-यांचा सेवा विषयक प्रकरणे हाताळणे व शासकीय आदेश लक्षात घेवून त्यावर निर्णय घेणे. सदर गा-हाण्याच्या संदर्भात आयुक्तांकडून घेतलेल्या निर्णयामध्ये जोपर्यंत शासनाकडून सुधारणा किंवा बदल केला जात नाही तोपर्यंत आयुक्तांकडून घेतलेला निर्णय अंतिम स्वरूपाचा असेल. तसेच ज्या प्रकरणात आयुक्तांच्या निर्णयात पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याचा प्रश्न असेल त्या संदर्भात संबंधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी पदोन्नतीच्या मानीव तारखा देण्याबद्दलच्या आयुक्तांच्या आदेशांची अंमलबजावणी करण्यापूर्वी त्याबाबत शासनाचे आदेश घेणे आवश्यक राहील.

ब] प्रत्यक्ष पहाणी/तपासणीचे काम – सर्व शासकीय विभागी, जिल्हा व तालुका व इतर कार्यालये तसेच विभागीय/जिल्हा स्तरावर वरील महामंडळे, महापालिका, नगरपालिका जिल्हा परिषदा इत्यादि कार्यालयांची वर्ग ३ व वर्ग ४ च्या किंवा तत्सम कर्मचा-यांच्या अनुषंगाने तपासणी करणे.

४. २. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१८८२/१६-ब, दिनांक १. ६. ८२ मधील आदेशान्वये सामान्य प्रशासन विभागामधील मागासवर्ग कक्षाचे अधिकारी, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी शासनाचे प्रतिनिधी म्हणून मागासवर्गीयासाठीचे आरक्षणाबाबतच्या आदेशांची विविध स्थानिक संस्था, सार्वजनिक क्षेत्रांतील उपक्रमे, सांविधिक संस्था, मंडळे, महामंडळे इत्यादिंकडूनही योग्य रितीने अंमलबजावणी होते किंवा नाही ही वस्तुस्थिती अजमाऊन पाहण्यासाठी

[ ...४/-]

आणि अशा मंडळाच्या कार्यान्वयन प्राधिका-यांना आवश्यक ते मार्गदर्शन करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी विभागीय/जिल्हा पातळीवरील अशा कार्यालयांना भेटी द्याव्यात असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. वरील आदेश लक्षात घेऊन सदर कार्यालयातील कर्मचा-यांच्या सेवा विषयक गा-हाण्यांची प्रकरणे विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखालील मागासवर्गीय कक्षाकडून हाताळली जातील, त्या गा-हाण्यांच्या संदर्भात शासकीय आदेश लक्षात घेवून आयुक्त योग्य सल्ला संबंधित कार्यालयांना देतील.

४.३. मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या नियंत्रणाखालील विविध स्थानिक संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमे, सांविधिक संस्था, मंडळे, महामंडळे, इत्यादिंना त्यांच्या सेवेतील कर्मचा-यांच्या सेवा विषयक गा-हाण्यांच्या संदर्भात विभागीय आयुक्तांनी दिलेला सल्ला व मार्गदर्शन लक्षात घेवून योग्य कार्यवाही करण्यासंबंधी निदेश निर्गमित करण्यात यावेत.

५. सर्व विभागीय आयुक्तांनी वरील आदेशान्वये त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या सहायक आयुक्त/अथवा तत्सम अधिकारी यांच्या अधिपत्याखाली आवश्यक कर्मचारीवृंद घेऊन एक वेगळा मागासवर्गीय कक्ष निर्माण करण्याबाबत १.९.८६ पर्यंत कार्यवाही करावी, आणि त्याप्रमाणे शासनास कळवावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ सु. रामकृष्ण ]
विशेष सचिव, सामान्य प्रशासन विभाग.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* आयुक्त, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नवी दिल्ली,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,

* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* कुलसचिव, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त, कार्यालय, मुंबई,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक,
सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख.

* पत्राने.

प्रिंनिमा/२३१०२८.